**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**
**क्रमांक-रानिआ/मनपा२००७/प्र.क्र. ६/का-५,**
**नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,**
**मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.**
**दिनांक- १० एप्रिल, २००७.**

**आ दे श**

राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये निवडणुकीच्या वेगवेगळया टप्प्यांमध्ये होणाऱ्या कार्यवाहीची माहिती आधी मिळावी यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणुकीशी संबंधित इतर अधिकारी यांच्यावर दबाव आणण्यात येतो. काही वेळेस निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी विशिष्ट पक्षाला अथवा गटाला रुचेल असाच निर्णय दयावा यासाठीही दबाव आणण्यात येतो. दबाव आणणाऱ्यांमध्ये निवडणूक लढविणारे उमेदवार, पक्षाचे पदाधिकारी, उमेदवारांचे प्रतिनिधी, खासदार, आमदार आणि इतर वरिष्ठ पदाधिकारी यांचाही समावेश असू शकतो.

२. नामनिर्देशनपत्रांची छाननी, उमेदवारी अर्ज मागे घेण्याची प्रक्रिया व निवडणुकीचा निकाल यावेळी तर दबाव फार जास्त असतो. तसेच प्रभाग रचना सुरु असताना प्रभाग रचना कशी होणार आहे याची माहिती आधी प्राप्त होण्यासाठीही दबाव आणण्यात येतो. अशा दबावाला बळी पडल्यास निवडणूक प्रक्रिया स्वच्छ, मोकळया, स्वतंत्र आणि मार्गदर्शक वातावरणात पार पडणार नाही. येथे स्पष्ट करण्यात येते की, निवडणूक कार्यात हस्तक्षेप करण्याचे कोणालाही विशेष अधिकार नाही.

३. हे सर्व प्रकार टाळण्यासाठी राज्य निवडणूक आयोग भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए खाली प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन असे आदेश देत आहे की, निवडणूक प्रक्रियेदरम्यान अथवा प्रभाग रचने काम सुरु असताना कोणत्याही व्यक्तीने किंवा प्रस्तावित उमेदवार अथवा त्याच्या प्रतिनिधीने अथवा पक्षाच्या पदाधिकाऱ्याने अथवा आमदार, खासदार यापैकी कोणीही निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणुकीशी संबंधित इतर अधिकारी यांचेवर दबाव आणल्यास त्याची माहिती राज्य निवडणूक आयोगाला सत्वर दयावी व अशा दबावाला बळी न पडता स्वतंत्रपणे निर्णय घ्यावा.

( नन्द लाल )
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व नगर परिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
सर्व तहसिलदार/राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

D:\CORPORATION\aab१२१.doc